जिल्हा नियोजन समिती, जिल्हा उस्मानाबाद आणि जिल्हा रायगडवर अध्यक्षांची नियुक्ती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग

शासन निर्णय क्रमांकः डिएपी-१०१८/प्र.क्र.१८/का.१४८१

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

तारीख: ०३ मार्च, २०१८

पहा –

१. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण २०१४/प्र.क्र.१३/ शिकाना/ १८-अ, दि.२६.१२.२०१४
२. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक:-डिएपी-१०१४/प्र.क्र.२९७/का.१४८१ दि.०८जानेवारी,२०१५
३. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण २०१४/प्र.क्र.१३/१८-अ, दि.२९.१२.२०१६
४. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक:-डिएपी-१०१६/प्र.क्र.३०२/का.१४८१ दि.०९ जानेवारी,२०१७
५. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण २०१४/ प्र.क्र.१३/१८-अ, दि.०५.०२.२०१८
६. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण २०१४/ प्र.क्र.१३/१८-अ, दि.०७.०२.२०१८

शासन निर्णय -

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील दि.२६.१२.२०१४ च्या शासन परिपत्रकान्वये राज्यातील ३६ जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुषंगाने संदर्भ क्र.२ येथील नियोजन विभागाच्या दि.०८.०१.२०१५ च्या शासन निर्णयान्वये सदर पालकमंत्र्यांची त्या त्या संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हा नियोजन समितीचे “अध्यक्ष” म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

२. संदर्भ क्र.३ येथील दि.२९.१२.२०१६ च्या शासन परिपत्रकान्वये संदर्भ क्र.१ येथील दि.२६.१२.२०१४ च्या शासन परिपत्रकामधील पालकमंत्र्यांच्या नियुक्तीमध्ये बदल करण्यात आले असून त्या बदलास अनुसरुन संदर्भ क्र.४ येथील दि.०९ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये जिल्ह्यांच्या जिल्हा नियोजन समितीच्या “अध्यक्षांची” नियुक्ती करण्यात आली असून सर्व जिल्ह्यांच्या जिल्हा नियोजन समितीच्या अध्यक्षांची यादी सोबत जोडून निर्गमित करण्यात आली आहे.

३. संदर्भ क्र.५ येथील दि.०५.०२.२०१८ व संदर्भ क्र.६ येथील दि.०७.०२.२०१८ च्या परिपत्रकान्वये याआधीच्या नियुक्त्यात बदल करुन खालीलप्रमाणे जिल्ह्यांचे पालकमंत्री म्हणून मंत्री महोदयांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

अ.क्र.	जिल्हा	पालकमंत्र्यांचे नाव
१.	उस्मानाबाद	श्री. अर्जुन खोतकर
२.	रायगड	श्री. रविंद्र दत्तात्रय चव्हाण

४. सदर बदलास अनुसरुन "महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, १९९८" च्या कलम ३ चा पोटकलम ४ मधील तरतुदीनुसार उपरोक्त तक्त्यात नमूद असल्याप्रमाणे जिल्ह्यांच्या पालकमंत्री यांची त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या जिल्ह्यांच्या जिल्हा नियोजन समितीचे **"अध्यक्ष"** म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

५. संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी सदरहू आदेश जिल्हा नियोजन समितीच्या सर्व सदस्यांच्या निदर्शनास आणावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३०३१२०७२३४२१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijesing Fattesing Vasave

Digitally signed by Vijesing Fattesing Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7de9682e22326e67a2c7e4125e658721c298e35048adffdff595b37a1b194aa, cn=Vijesing Fattesing Vasave
Date: 2018.03.03 18:09:21 +05'30'

(वि.फ.वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जिल्हा उस्मानाबाद आणि रायगड

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, (वित्त व नियोजन), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद आणि कोकण
७. सदस्य-सचिव, मराठवाडा आणि उर्वरीत महाराष्ट्र विकास मंडळ.
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.उस्मानाबाद आणि रायगड
९. सर्व सहसचिव/ उपसचिव/अवर सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुबई,
११. उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद आणि कोकण
१२. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद आणि रायगड
१३. निवड नस्ती का १४८१ नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.